मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## ग्यानबा तुकारामाच्या गजराने देहू दुमदुमून निघाली : लाखोंच्या संख्येने देहूत वारकरी दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं आहे. ग्यानबा तुकारामाच्या गजरात अवघा मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालताच पालखीचा इनामदार वाड्यात पहिला मुक्काम असेल. तिथं रात्री आरती, मग कीर्तन होईल. लाखोंच्या संख्येने देहूत वारकरी दाखल झाले आहेत.



जगतगुरू संत तुकाराम महाजारांचा ३३९ वा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक देहूत दाखल झाले होते. ग्यानबा तुकाराम आणि ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या गजराने अवघी देहू नगरी दुमदुमून गेली होती. काल पासून देहूत गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. इंद्रायणी तिरी वैष्णवांचा मेळा भरला होता.

सकाळी इनामदार वाड्यात जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. तिथून टाळ मृदंगच्या गजरात मुख्य मंदिरात पादुका आणण्यात आल्या. काही वेळातच अश्व आणि दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन झाले. काल्याचे कीर्तन झाल्यानंतर ठीक पावणे तीनच्या सुमारास तुकोबांच्या पालखीने ग्यानबा तुकारामाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. यावेळी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त होता. चोरीच्या घटना घडू नयेत म्हणून साध्या वेशात पोलीस पोलीस फिरत होते. चोरट्यांवर आणि संशयितांवर पोलोसांची नजर होती.

### सोयीसुविधांची तयारी पूर्ण

श्री. क्षेत्र देहू ते पंढरपूर आषाढी वारीचा ३३९वा पालखी सोहळा २८ जून ते १७ जुलै कालावधीत साजरा होत आहे. त्या अनुषंगाने जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू नगरपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या वतीने सोयीसुविधांची तयारी पूर्ण झाली आहे. सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यांतून भाविक देहूमध्ये दाखल होऊ लागले आहेत. मुख्य मंदिरासह संत तुकाराम महाराज मंदिर, पालखी सोहळ्याचे जनक तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिर या ठिकाणी फुलांची सजावट, विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

### 'निर्मल वारी'चा संकल्प

» संस्थान आणि नगरपंचायत यांच्या वतीने यंदाही 'निर्मल वारी'चा संकल्प करण्यात आला आहे. त्यासाठी स्वच्छतेच्या अनुषंगाने पथकांची स्थापना करण्यात आली आहे. जवळपास ५०हून अधिक कर्मचाऱ्यांच्या मदतीने इंद्रायणी नदीघाट, देऊळवाडा या ठिकाणी स्वच्छता केली जात आहे. गावात ठिकठिकाणी एक हजारांहून अधिक स्वच्छतागृहे उभारण्यात आली आहेत. रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात आले असून, भाविकांसाठी २४ तास पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# एखाद्याचा जीव गेल्यावर ट्रान्सफॉर्मर हटवणार का?

## चिखलीकरांच्या डोक्यावरची टांगती तलवार : वर्षानुवर्षे ट्रान्सफॉर्मर स्थलांतरणाचे रखडले कामकाज

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली-पाटीलनगर आणि सत्संग रोड या दोन्ही ट्रान्सफॉर्मरसाठी जागा उपलब्ध असतानाही स्थलांतरण रखडले का? कोणाचा जीव जाण्याची प्रशासन वाट पाहतेय का? असा संतप्त सवाल चिखलीकरांकडून केला जात आहे. महापालिका प्रशासनाकडून ट्रान्सफॉर्मर स्थलांतर करण्यासाठी का चालढकल केली जात आहे. सर्वसमान्यांचा जीव टांगणीला लागल्याचे चित्र पहायला मिळत असून, चिखलीकरांच्या डोक्यावरची टांगती तलवार बाजूला करा, ट्रान्सफॉर्मर हटवा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

ट्रान्सफॉर्मर हटलाच पाहिजे, चिखलीकरांचा टांगणीला लागलेला जीव निघालाच पाहिजे अशा आशयाचे फ्लेक्स धोकादायक ट्रान्सफॉर्मर आणि आजूबाजुला लावून प्रशासनातील अधिकाऱ्यांची डोळे उघडणी केली आहे. या धोकादायक ट्रान्सफॉर्ममुळे फक्त वाहतूक कोंडीच नव्हे तर एखाद्याचा जीव जाण्याची भिती आहे. सर्व दुचाकी, चारचाकी या ट्रान्सफॉर्मला घासून जातात. भविष्यात काही कमी-जास्त झाल्यास याला जबाबदार कोण?असा सवालही चिखलीकरांकडून केला जात आहे.



" पाटीलनगर चिखलीतील ट्रान्सफॉर्मरचा विषय वर्षानुवर्षे रखडलेला आहे. तसाच सत्संग रोड च्या कॉर्नरचा आहे. ज्यांना या कामाचे श्रेय घ्यायचे त्यांनी घ्यावे, मात्र त्यासाठी नागरिकांचा जीव टांगणीला लावू नये. ट्रान्सफॉर्मर हलविण्यासाठी अनेक आंदोलने, उपोषणं झाली, मात्र ट्रान्सफॉर्मर जागीच आहे. यामुळे वाहतूक कोंडी, गाड्यांना टर्न घेताना मोठी अडचण होते आहे. पोलिस प्रशासन, महापालिका प्रशासन आणि महावितरण या तिघांच्या समन्वयातून हा तिढा सुटणे आतापर्यंत आवश्यक होते. मात्र पाणी कुठं आणि का मुरतेय हे समजत नाही.

**- विकास साने, सामाजिक कार्यकर्ते.**

" महापालिका प्रशासन आणि महावितरण यांच्या समन्वयातून हे काम मार्गी लागणार आहे. तसेच साने चौक ते चिखली चौक रस्ता रूंदीकरण होणार असून, पुन्हा रस्त्याच्या मध्ये अडचण येऊ नये, यासाठी दोन्ही विभागाचा समन्वय साधून काम पूर्णत्वास न्यावे लागणार आहे. ट्रान्सफॉर्मर स्थलांतरणासाठी इस्टीमेट तयार करून सिव्हील डिपार्टमेंटला दिले आहे. त्यामुळे लवकरात-लवकर काम मार्गी लागेल.

**- वासुदेव मांढरे, फ प्रभाग कार्यकारी अभियंता.**

" चिखली पाटीलनगर आणि सत्संग रोड चा कॉर्नर या ठिकाणचा धोकादायक ट्रान्सफॉर्मर हटविण्यासाठीची मागणी अनेक दिवसांपासून केली जात आहे. या ट्रान्सफॉर्मरमुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात दोन्ही ठिकाणी होते. वाहतूक कोंडी झाल्यावर नागरिकांना चालणेही मुश्किल होते. धोकादायक ट्रान्सफॉर्मरमुळे कोणाच्याही जिवीतास धोका निर्माण होऊ नये यासाठी ते लवकरात-लवकर स्थलांतरीत करावे.

**- निलेश लोखंडे, चिखली ग्रामस्थ, आंतरराष्ट्रीय खेळाडू.**

# पुणे प्रकरणावरुन सभागृहात खडाजंगी

## पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं विधानसभेत निवेदन

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणीनगर भागात गतमहिन्यात झालेल्या भीषण पोर्शे कार अपघात प्रकरण आणि पुणे ड्रग्जप्रकरणावरुन आज सभागृहात चांगलीच जुगलबंदी पाहायला मिळाली. राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या प्रश्नाला उत्तर देताना पुण्याला उडता पंजाब म्हणणं योग्य नाही, असे म्हटले. तसेच, पुणे पोर्शे कार अपघातप्रकरणी पोलिसांनी केलेल्या कारवाईवरही त्यांनी भाष्य केलं. विधानसभा अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी निवेदन सादर केल्यानंतर विरोधी पक्षांनी 293 च्या प्रस्तावानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलीच जुगलबंदी पाहायला मिळाली. देवेंद्र फडणवीसांनी विरोधी पक्षनेत्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना पुणे अपघातप्रकरणी पोलिसांच्या दोन चुका झाल्याचंही मान्य केलं.



विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात बोलताना म्हटले की, आज विरोधकांचा 293 चा प्रस्ताव आहे, या प्रस्तावामध्ये चंदा लो धंदा दो अशा प्रकारचे वाक्य टाकलं होतं. मात्र, ते वाक्य का वगळण्यात आलं हे आम्हाला माहीत नाही. सरकार यावर चर्चा करायला का घाबरते, असा सवाल करत आमच्या हक्कांचं संरक्षण झालं पाहिजे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले. या सभागृहात नियम आहेत, जे काही सभागृहात येणे योग्य नाही ते वगळण्यात आलेलं आहे, त्यामुळे हे वाक्य मी वगळलेलं आहे, असे स्पष्टीकरण विधानसभा अध्यक्षांनी वडेट्टीवारांच्या प्रश्नावर दिले.

पुण्यातील हिट अँड रन प्रकरणावरुन शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी लक्षवेधी मांडत प्रश्न उपस्थित केले. पुण्यातील हिट अँड रन ही घटना अतिशय दुर्दैवी आहे, यातील आरोपीने मद्य प्राशन केलेलं होतं, पण या आरोपीला पोलीस स्टेशनमध्येच बर्गर, पिझ्झा दिला गेला. या आरोपीवरती काय कारवाई केली याची माहिती सभागृहाला द्यावी, अशी मागणी प्रभू यांनी केली होती. प्रभू यांच्या मागणीवर गृहमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले.

### गृहमंत्री फडणवीसांचे उत्तर

पुणे पोर्शे कार अपघाताची घटना घडली, तेव्हा या आरोपाला मारहाणही करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी चालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून सुरुवातीला 304 अ अंतर्गत हा गुन्हा दाखल केला होता. मात्र, त्याच दिवशी 304 चा गुन्हा दाखल करण्यात आला. त्या दिवशी जी बाजू मांडली ती माझ्याकडे आहे, याप्रकरणात पोलिसांनी तात्काळ अपील दाखल केलं. तसेच, आरोपीच्या रक्ताचा नमुना घेतला, तो त्याच्या वडिलांशी देखील मॅच करण्यात आला. मात्र, तो मॅच होत नव्हता. त्यामुळे, पोलिसांनी तपासाअंती डॉक्टरांना अटक केली. त्यात 3 लाख रुपये एकाने घेतल्याचे कबुल करण्यात आले आहे. आरोपी पहिल्या आणि दुसऱ्या बारमध्ये बसला होता, त्याचे बिल आणि सीसीटीव्ही पोलिसांनी जप्त केलं आहे. याशिवाय आरोपीच्या वडिलांवर कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी सभागृहात दिली.

### विजय वडेट्टीवारांचे सवाल

कायद्याचं राज्य राहिलं नाही, पोर्शे कार अपघातातील कारला 6 महिन्यांपासून नंबर प्लेट नव्हती, तरीही कार रोडवर धावत होती. त्यामध्ये काही राजकीय कारण आहे का, याचा तपास केला पाहिजे. तसेच, रक्त सँपल बदलण्यात आले होते, पुण्यात 450 ओपन टेरेस हॉटेल्स आहेत. पोलिसांसाठी 5 लाखांचा हप्ता बांधला गेल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. तर, लहान हॉटेल्ससाठी अडीच लाख रुपयांचा हप्ता आहे. पुण्यात गुंडांची परेड घेतली की ओळख करुन दिली, असा सवालही विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

# मुलींसाठी मोफत शिक्षण कायद्याची अंमलबजावणी करा!

## संतोष सौंदणकर यांचा सरकारला इशारा : उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांवर व्यक्त केला संताप

**पुणे | प्रतिनिधी**

इयत्ता बारावीनंतरचे शिक्षण घेण्याचे मुलींचे प्रमाण कमी असल्याने ते वाढवण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मुलींना बारावीनंतरचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला. मिंदे सरकारमधील मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात राणा भिमाच्या थाटात महाराष्ट्राच्या समोर येऊन ही वल्गना केली. आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाले असताना त्याची अंमलबजावणी करण्याचा सरकारला विसर पडल्याचे दिसते. आश्वासनांची पुर्तता करता येत नसेल तर देता कशाला? असा संतप्त सवाल शिवसेना (उध्दव ठाकरे) शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी राज्य सरकारला केला आहे.



यासंदर्भात शिवसेना शहर संघटक सौंदणकर यांनी प्रसिध्दी पत्रक दिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, इयत्ता बारावीनंतरचे शिक्षण घेण्याचे प्रमाण मुलींमध्ये खूपच कमी आहे. सामाजिक दृष्या ही बाब गंभीर असून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारने विधायक पाऊल उचलणे गरजेचे आहे. मुलींना इयत्ता बारावीनंतरचे उच्च शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण घेता यावे, यासाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक घेतली होती. आठ लाखांपेक्षा कमी वार्षीक उत्पन्न असणा-या मागासवर्ग तसेच आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील मुलींच्या अभ्यासक्रमाचे 100 टक्के शूल्क राज्य सरकारतर्फे भरण्याचा निर्णय बैठकीत घेतला. मिंदे सरकारचे मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात नवीन शैक्षणिक वर्षात (जून 2024) या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची घोषणा चंद्रकांत पाटील यांनी केली होती. आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होऊन महिना उलटत आला. तरी, सरकारकडून या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर या निर्णयाची घोषणा करणे म्हणजे जुमला तर नव्हता ना? असा सवाल सौंदणकर यांनी उपस्थित केला आहे.

### राज्य सरकारचा बेजबाबदारपणा..

**» राज्य सरकारच्या बेजबाबदारपणामुळे बारावीनंतर मुलींना महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी अडचणी येत आहेत. सरकारच्या मोफत शिक्षणाच्या निर्णयाची आठवण करुन दिल्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक आणि पालक यांच्यात वादावादी होत आहे. त्यामुळे मुलींच्या पालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. मुलींचे शैक्षणिक शुल्क राज्य सरकार भरणार आहे, तुम्ही कसले पैसे मागता, असे पालक विचारत आहेत. त्यावर अद्याप राज्य सरकारकडून तसा आदेश प्राप्त झाला नसल्याचे महाविद्यालयाकडून सांगितले जात आहे. त्यामुळे मुलींचे भवितव्य घडविण्यासाठी झटणा-या पालकांची घुसमट होत आहे. राज्य सरकारचे हे नेमके काय चालले आहे?, एकीकडे आश्वासने द्यायची आणि दुसरीकडे महाविद्यालयाला मोफत शिक्षण देण्याचा आदेश पाठवायचा नाही. राज्य सरकारने त्वरीत आदेश देऊन मुलींच्या बारावीनंतरच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासंदर्भात राज्यातील सर्व महाविद्यालयांना खात्री द्यावी, अन्यथा राज्यातील मिंदे सरकारकडून झालेला मुलींचा व त्यांच्या पालकांचा अवमान कदापी सहन केला जाणार नाही, असा सज्जड इशारा शिवसेना शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी मिंदे सरकारला दिला आहे.**

# पीएमआरडीएनेच फिरवली 'इंद्रायणी' सुधाराकडे पाठ

## केंद्र पातळीवर पाठपुराव्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष : कानउघडणीनंतरही प्रदूषणाकडे डोळेझाक

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदी दिवसेंदिवस प्रदूषित होत असताना, त्याकडे कोणताही विभाग जाणीवपूर्वक लक्ष देताना दिसत नाही. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचे डोळे उघडत नसल्याने वारकरी, स्थानिक नागरिकदेखील हतबल झाले आहेत. दुसरीकडे, या नदीसुधार प्रकल्पाचा गवगवा करणाऱ्या पीएमआरडीएकडून नदीसुधार प्रकल्पाचा एकही कागद हलला नाही. केंद्राकडे बोट दाखवून प्रशासन याबाबत जबाबदारी झटकताना दिसत आहे. विशेष म्हणजे प्राधिकरणातील एकही अधिकारी या विषयावर बोलायला तयार नाही.

या प्रकल्पात पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्र व इतर ४६ गावे आहेत. देहू व आळंदी ही महत्त्वाची तीर्थक्षेत्रे इंद्रायणी नदीच्या काठावर वसलेली आहेत. इंद्रायणी नदीबाबत राज्यपातळीवर दखल घेण्यात आली होती. त्यानुसार पीएमआरडीच्या वतीने हा प्रकल्प राबवण्यात यावा, अशा सूचना देखील करण्यात आल्या होत्या. त्यानुसार काही महिन्यांपूर्वी या नदीबाबत सर्वेक्षण करून त्याचा सविस्तर अहवाल तयार केला होता. इंद्रायणी नदीत घरगुती आणि औद्योगिक सांडपाणी, मैला सोडल्यामुळे नदी प्रदूषित झाली आहे. दिवसेंदिवस नदीपात्रात फेस येत असून, पाणीही काळवंडले आहे. ऐन आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर या नदीची अवस्था आणखीच बिकट झाली आहे. मध्यंतरी याची दखल थेट मुख्यमंत्री कार्यालयाकडून घेण्यात आली होती. त्याबाबत महापालिका आयुक्तांची त्यांनी कानउघडणीही केली होती. त्यानंतर पर्यावरण विभागाकडून तुटपुंजी कारवाई दाखवण्यात आली.



दरम्यान, पीएमआरडीच्या वतीने त्यावेळी सद्यस्थितीत ५७७.१६ कोटी रकमेचा अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र शासनास सादर करण्यात आला होता. या प्रकल्पाबाबत केंद्र व राज्य शासनाकडून प्रदूषण नियंत्रण या कामास भांडवली किमतीच्या ६०:४० टक्के प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे. मात्र, पीएमआरडीएकडून अपेक्षित पाठपुरावा नसल्यानेच हा प्रकल्प लांबणीवर पडला आहे. प्रस्ताव राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने स्वीकारला असून केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला असल्याचे पीएमआरडीच्या वतीने सांगण्यात आले. या प्रकल्पाअंतर्गत इंद्रायणी नदीच्या दोन्ही तीरावरील एकूण ५४ गावे व शहरांमधून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. यात लोणावळा, तळेगाव दाभाडे व आळंदी या तीन नगर परिषदा, वडगाव व देहू या दोन नगरपंचायती, देहू कॅन्टोन्मेंट बोर्ड, १५ हजारूंन जास्त लोकसंख्येच्या तीन ग्रामपंचायती व इतर ४६ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

नदीचे पात्र स्वच्छ करणे व शुद्धीकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविणे, काठावरील मुख्य ठिकाणी रिव्हरफ्रंट्स विकसित करण्याची योजना तयार करणे, नदीत जलवाहतूक प्रणाली पुरविण्याच्या व्यवहार्यतेचे मूल्यांकन करणे, तसेच आवश्यक असल्यास दरवाजाची व्यवस्था करण्याच्या तरतुदींसह जलवाहतूक प्रस्तावित करणे. पूर्व सुसाध्यता अहवाल तयार करणे, मास्टर प्लॅन आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे, अशी कामे सुधार प्रकल्पाअंतर्गत होणे अपेक्षित आहे.

### पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना गांभीर्य नाही

» शहरालगत असलेल्या आणि तीर्थक्षेत्रालगतच्या इंद्रायणी नदीबाबत अधिकाऱ्यांना कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून आले. याबाबत मुख्य अभियंता अशोक भालकर यांनी हे नेहमीप्रमाणे बैठकीत व्यस्त होते. तर, अधीक्षक अभियंता प्रशांत पाटील यांनी त्याबाबतची माहिती घेण्यासाठी संपर्क साधला असता, या प्रकल्पाचे गांभीर्य त्यांना नसल्याचे दिसून आले. कनिष्ठ अधिकाऱ्याकडून माहिती घेऊन सांगतो, असे सांगून त्यांनी याबाबत अधिक माहिती देण्यास टाळाटाळ केली.

# सर्विस रस्त्यांसाठी पुनावळेकर हैराण!

## नवनाथ ढवळे यांची मागणी : पुनावळे भागातील रस्त्यांच्या दुरूस्तीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील पुनावळे भागातील एनएच-4 लगतचे सर्विस रस्ते अत्यंत दयनीय अवस्थेत आले आहेत. जागोजागी खड्डे झाले असून हे रस्ते अत्यंत खराब झाले आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत, या पावसाळ्याच्या दिवसात रस्त्याचे अशी दुरावस्था झाल्याने अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. या खराब रस्त्यांमुळे रोज छोटे-मोठे अपघात हे होतच असतात त्यामुळे येथील नागरिक संतप्त झाले आहेत. त्यामुळे संबंधित रस्त्यांची पाहणी करुन दुरस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी भाजपाचे उपाध्यक्ष



नवनाथ ढवळे यांनी केली आहे.

सदर पुनावळे भागातील एनएच-4 लगतचे सर्व रस्ते दुरुस्त करावे, त्यांचे डांबरीकरण करावे, अशी मागणी मी पुनवळेकर संस्थेच्या वतीने नवनाथ मारुती ढवळे यांनी कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग राष्ट्रीय महामार्ग पुणे यांच्याकडे केली आहे. सदर रस्त्यांची पाहणी करून ते त्वरित दुरुस्त करून घ्यावे, असे नवनाथ ढवळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

साई पेट्रोल पंप ताथवडे ते पवना नदी पुनावळेपर्यंतचा सर्विस रस्ता तसेच पवना नदी पुनावळे ते जीएसपीएम कॉलेज ताथवडे पर्यंतचा सर्विस रस्ता या रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचेही दिलेल्या निवेदनात नवनाथ ढवळे यांनी नमूद केले आहे.

# नदीपात्रातील बेकायदा बांधकामांवर बुलडोझर!

## म्हात्रे, राजाराम पूल, कर्वेनगर पात्रातील 90,000 चौरस फूट क्षेत्र मोकळे : 15 मिळकती जमीनदोस्त

**पुणे | प्रतिनिधी**

म्हात्रे पूल, राजाराम पुलादरम्यानच्या नदीपात्रातील हरित पट्ट्यात जागामालकांनी बेकायदा बांधकाम केले होते. त्या विरोधात महापालिकेने कारवाई केल्याने जागामालकांनी न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर पालिकेच्या बांधकाम विभागाने गुरुवारी सकाळी या जागेवरील बेकायदा बांधकामावर बुलडोझर चालवला. डीपी रस्त्यावरील निळ्या पूर रेषेमध्ये येणारी विनापरवाना बांधकामे आज जमीनदोस्त करण्यात आली. एकूण १५ मिळकतींवर कारवाई करून सुमारे ९०,००० चौरस फूट क्षेत्र मोकळे केले.





म्हात्रे पूल ते राजाराम पूल आणि कर्वेनगरमध्ये नदीपात्रालगत मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे केली आहेत. मोठ मोठी हॉटेल, गॅरेज, मंगल कार्यालय उभारले आहेत. मोठे शेड उभारून मंगल कार्यालयाचा धंदा सुरू केला आहे. मात्र हे बांधकाम बेकायदा आहे. त्याला पालिकेची कोणतीही परवानगी नव्हती. त्यामुळे बांधकाम विभागाने सतत नोटिसा दिल्या होत्या. तसेच अनेकदा कारवाईही करण्यात आली होती. ऐन दिवाळीत, लग्नसराईत बांधकाम विभागाने या मंगल कार्यालयांवर कारवाई केली होती. मात्र लग्न समारंभ असल्याने कोणाच्या शुभ कार्यात विघ्न नको म्हणून मंगल कार्यालयांना स्वतःहून अतिक्रमण आणि बेकायदा बांधकाम काढून घेण्यास सांगितले होते. त्यानंतर पालिकेने कारवाई करू नये यासाठी १३ जागामालकांनी २०२२-२३ मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावेळी सुनावणीमध्ये न्यायालयाने कारवाईस स्थगिती दिली. दरम्यान, ज्या जागामालकांनी न्यायालयात याचिका दाखल केली नव्हती, त्यातील काही जणांनी स्वतःहून बांधकाम पाडले, शेड काढून घेतले होते. ज्यांनी स्वतःहून कारवाई केली नाही तेथे महापालिकेने कारवाई केली होती.

नदीपात्रातील ही व्यवसायासाठी वापरता येत नाही, तरीही मोठ्या प्रमाणात बांधकाम करून व्यवसाय सुरू होता. तसेच संबंधित बांधकाम नियमित करण्यासाठी पालिकेकडे अर्जही केला नव्हता. हा मुद्दा पालिकेच्या न्यायालयात मांडण्यात आला. त्यावर न्यायालयाने बांधकाम नियमित करता येणार नसल्याचे निरीक्षण नोंदवले. त्यानंतर पालिकेच्या बांधकाम विभागाने आज कारवाई सुरू केली. रात्री उशिरापर्यंत कारवाई सुरू होती. कारवाईदरम्यान स्थानिक, अतिक्रमण विभागाचा पोलीस बंदोबस्त होता. ५ जेसीबी, दोन गॅस कटर, १० कामगारांच्या मदतीने कारवाई करण्यात आली. या ठिकाणी अग्निशमन विभागाची गाडी सज्ज ठेवली होती.

# पुणेकरांच्या सुरक्षेसाठी दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालयाचा आदेश

## उच्चस्तरीय समिती स्थापन करून चार आठवड्यात रोड मॅप तयार करण्यास बजावले : याचिकेवरील पुढील सुनावणी 14 ऑगस्ट रोजी

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील नद्यांच्या पूररेषांचा सर्वंकष आढावा घेऊन पूररेषा नव्याने आखा, असे स्पष्ट आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. तसेच न्यायालयाने या संदर्भात उच्चस्तरीय समिती नेमण्याचेही आदेश दिले असल्याची माहिती सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी दिली. याचिकेवरील पुढील सुनावणी १४ ऑगस्ट रोजी होणार आहे.



पुण्यातील नद्यांच्या पूररेषा निश्चित करताना जलसंपदा विभागाने अनेक महत्त्वपूर्ण गोष्टी विचारात घेतलेल्या नाहीत, त्यामुळे पुणेकरांच्या सुरक्षिततेसाठी या पूररेषा नव्याने अभ्यास करून पुन्हा आखाव्यात, या मागणीसाठी सारंग यादवाडकर, विवेक वेलणकर आणि विजय कुंभार यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावरील सुनावणीत न्यायालयाने अंतरिम आदेश देताना या विषयाचा सर्वंकष आढावा घेऊन नव्याने पूररेषांची आखणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

जलसंपदा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली २ आठवड्यात एक उच्चस्तरीय समिती स्थापन करून ४ आठवड्यात समितीने यासाठीचा रोड मॅप तयार करून उच्च न्यायालयात सादर करावा, असेही आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. सुनावणीवेळी न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय आणि बोरकर यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले आहेत.

शहरातील सर्व नदी पूररेषांचे पुनर्मूल्यांकन करावे लागणार आहे. या निर्देशात पूर धोके कमी करण्यासाठी आणि पुणेकरांच्या जीवनाचे रक्षण करण्यासाठी अचूक, अद्ययावत मूल्यांकन निश्चित करण्यासाठी पुण्यातील सर्व नद्यांच्या पूररेषांचा सर्वंकष आढावा घेण्यास सांगितले आहे. जलसंपदा विभागाकडून गेल्या १५ वर्षांत दोन वेळा पूररेषेची आखणी करण्यात आली आहे. त्यानंतरही पूररेषेचा गोंधळ असल्याने नदीपात्रात अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे झाली आहेत. परिणामी, नदीची वहन क्षमता घटली असून शहरात सातत्याने पूरस्थिती उद्भवत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे ही याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकेवरील पुढील सुनावणी १४ ऑगस्ट रोजी होणार आहे.

सारंग यादवाडकर म्हणाले की, शहराला तीव्र पुराचा धोका लक्षात घेता, आम्हाला पुण्यातील पूररेषांच्या सदोष सीमांकनाबद्दल काळजी वाटली, म्हणून जनहित याचिका दाखल केली. न्यायालयाच्या निर्देशांनुसार पूररेषांचा सर्वंकष आढावा घेऊन पूररेषा नव्याने आखल्याने भविष्यात नदीपात्राचे अतिक्रमणांपासून संरक्षण होण्यास मदत होईल.